स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 21—10—2015** रोजी **सायंकाळी 05—00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 5. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 6. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 8. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 10. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 11. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 4. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 236**:— प्रभाग क्र. 20 अ मधील भिमरत्न नगर नोगा फॅक्ट्री, ज्योती नगर, लष्करीबाग येथील नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 25,99,710/— (अक्षरी पंचवीस लक्ष नव्याण्णव हजार सातशे दहा रुपये) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सुचनेप्रमाणे पद क्र. A43901370812 (नागपूर शहरातील नाले बांधणे) या पद ातुन तरतुद मुक्त करण्यांत येते. या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 237</u>:— प्रभाग क्र. 53 अ,ब मधील संजयनगर सिंगल लाईन व पापुलर सोसायटी काचीमेट, रामनगर येथे श्री. त्रिवेदी ते जोशी यांच्या घरापर्यंत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 29,98,467/— (अक्षरी एकोनतीस लक्ष अठ्ठयानऊ हजार चारशे सदुषष्ठ फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 238</u>:— प्रभाग क्र. 12 ब अंतर्गत गुरुनाननकपुरा, अशोकनगर व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 26,00,000/— (अक्षरी सव्वीस लक्ष रुपये) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 239</u>:— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाकरीता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरीता रू. 19988625/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 240</u>:— प्रभाग क्र. 48 अंतर्गत रेशीमबाग संघ बिल्डिंग येथील रस्त्याचे बांधकाम व पावसाळी नालीचे काम करण्याचे कामास्तव रु. 71,06,944/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 241</u>:— प्रभाग क्र. 67 ब अंतर्गत दिवान ले—आऊट येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 28,41,505/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 242</u>:— प्रभाग क्र. 31 — ब, अंतर्गत मस्कासाथ मध्ये भाजीमंडी बालाजी मंदीर रोड, निकालस मंदीर, नेहरु पुतळा जवळ व इतर ठिकाणी सी. सी.पेव्हमेंटची कामे करण्याच्या कामास्तव रु.39,99,830/— प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 243</u>:— प्रभाग क्र. 57— अ, मध्ये एम्प्रेस मिल कॉलनी आणि जोशीवाडी येथील रस्ते डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 25,99,522/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 244</u>:— प्रभाग क्र. 11 ब येथील बुद्धनगर येथील वस्तीतील व बेझनबाग येथील नाल्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 25,99,935/— (अक्षरी पंचवीस लक्ष नव्याण्णव हजार नवशे पस्तीस रुपये) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 618 व नवीन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 245</u>:— वित्तीय वर्ष 2015—16 करीता म.न.पा. मंजूरी अंदाजपत्रकान्वये लकडगंज झोन क्र. 8 करीता एकुण रू. 744.50 लक्ष

म.न.पा. स्थयी समितीने विविध पदांतर्गत (महसुली व भांडवली) आवंटन केले आहे. या आधारे प्राप्त राशीची क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग निहाय व क्षेत्रीय कार्यालयातील म्हणजेच रू. 744.50 लक्षचे आवंटन प्रस्तावित केले आहे. सबब ठरावानुषंगाने रू. 744.50 लक्ष राशीचे क्षेत्रीय कार्यालयाचे वर्ष 2015–2016 च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करणे याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 246:— प्रभाग क्र. 5 ब येथील सिद्धार्थ नगर येथे रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रु. 26,60,135/— (अक्षरी सव्वीस लक्ष साठ हजार एकशे पस्तीस रुपये) रकमेच्या प्राकलनास जुने पद क्र. 681 व नवीन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 247:— प्रभाग क्र. 32 – ब, स्मॉल फॅक्टरी एरीया येथे जे के टॉवर ते हार्दीक लॉन पर्यत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.बी. केबलरमानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.77 टक्के कमी दराची रू. 84,15,922/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्यासह सन 2015–16 या आर्थीक वर्षात पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 248:— प्रभाग क्र. 23 अ मधील कोलपुरा ते देशराजनगर पर्यंत रस्त्याचे दुरुस्ती करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.बी.केवलरमाणी यांची प्राकलनीय दरापेक्षा 30.99% ने कमी रु. 26,19,624/— (अक्षरी सव्वीस लक्ष एकोणतीस हजार सहाशे चोवीस रुपये फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्यासह सन 2015–16 या वर्षात पद क्र. (A200133802) अंतर्गत तरतूद उपलब्धस करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 249:— प्रभाग क्र. 48 अ अंतर्गत रेशीमबाग येथील व्हॉलिबॉल मैदानाला संरक्षण भिंत बांधण्याचे काम करण्याचे कामास्तव रु. 32,28,002/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 250:— स्व.प्रभाकरराव दटके स्मृती महाल रोगनिदान केंद्र येथे पीपीपी तत्वावर मोतीबिंदु शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करण्याकरिता जाहिरात क्र. 303/PR/22/12/14 दि. 23.12.2014 ला ई.ओ.आय. मागविण्यात आले होते. लॉयन्स क्लब ऑफ नागपूर अमेज यांचे दर मोतीबिंदु शस्त्रक्रिया (सामान्य रु. 1300/— /Phacoemulsification रु. 2300/—) करण्यासाठी सर्वात कमी आहे. लॉयन्स क्लब ऑफ नागपूर अमेज यांना म.न.पा. अटी व शर्तीनुसार स्व. प्रभाकरराव दटके स्मृती महाल रोगनिदान केंद्र येथे पीपीपी तत्वावर मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 251:— प्रभाग क्र. 27, बजेरिया मधील बजेरिया चौक ते मसोबा मंदीर पर्यंत सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता तयार करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 25,52,520/— रकमेच्या प्राकलनाास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 681(A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 252 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर